

**महाराष्ट्र शासन**
विधि व न्याय विभाग
५ वा मजला, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२०२६९९३ Email ID : shrikant.yadav@nic.in

---

क्रमांक :संकीर्ण-११२५/प्र.क्र.८८/का-३ दिनांक : १८ फेब्रुवारी.२०२६.

प्रति,

मा.महाप्रबंधक,
उच्च न्यायालय,
मुंबई ४००.०३२.

विषय:- नव्याने स्थापित भूमिसपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण अमरावती व नाशिक तसेच भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या तिन प्राधिकरणांकरिता पिठासीन अधिकारी नियुक्ती करणेबाबत.

**संदर्भ:-** १) आपले क्र.A.१२१९/२०१७/१२६५/२०२५, दि.१०.०७.२०२५ चे पत्र.
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.०१.१०.२०२५ रोजीचे पत्र.
३) शासनाचे समक्रमांकाचे दि.०६.११.२०२५ रोजीचे स्मरणपत्र.
४) शासनाचे समक्रमांकाचे दि.०२.०२.२०२६ रोजीचे स्मरणपत्र.
५) महसूल व वन विभागाची दि.१२.०२.२०२६ रोजीची टिप्पणी.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.५ ची टिप्पणी कृपया पहावी. (प्रत सलग्न)

२. उपरोक्त टिप्पणीन्वये महसूल व वन विभागाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण अमरावती, नाशिक व छत्रपती संभाजीनगर करिता पीठासीन अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी व सदर पदावर तात्काळ रुजु होऊन सदर पदाचा कार्यभार स्विकारुन संपूर्ण कार्यकाळ पूर्ण करण्यास इच्छुक असणा-या किमान ६ ते ९ न्यायिक अधिका-यांची नावे त्यांच्या वैयक्तिक तपशीलासह उपलब्ध करुन देण्याची विनंती या विभागास केली आहे.

३. त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३५ अनुसार दुय्यम न्यायालयीन कामकाजा संदर्भात सर्व नियंत्रण अधिकार मा. उच्च न्यायालयास प्रदान

करण्यात आले आहे. त्यामुळे, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण अमरावती, नाशिक व छत्रपती संभाजीनगर करिता पीठासीन अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी व सदर पदावर तात्काळ रुजु होऊन सदर पदाचा कार्यभार स्विकारुन संपूर्ण कार्यकाळ पूर्ण करण्यास इच्छुक असणा-या किमान ६ ते ९ न्यायिक अधिका-यांची शिफारस करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(श्री.च.यादव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र: वरीलप्रमाणे